# प्रकरण सहावे समारोप (उपसंहार)

इचलकरंजी शहर हे महाराष्ट्राचे ' मँचेस्टर ' म्हणून ओळखले जाते. इचलकरंजीमध्ये वस्त्रोदयोग मोठ्या प्रमाणात असून येथे तयार होणारे कापड धोती साड्या जगभरातील बाजारपेठेत सुप्रसिध्द आहेत. इचलरंजीला वस्त्रनगरी मँचेस्टर बनवण्याचे श्रेय येथील संस्थानिक नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांच्याकडे जाते. ह्या उदयोग नंतर सहकारी संस्थाव्दारे व खाजगी व्यक्तीव्दारे फोफावला जहागिरदारांनी रुजवलेल्या छोटयाशा बीजाचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. त्याचबरोबर आधुनिक काळामध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रीया अत्यंत वेगाने सुरु आहेत. या विकासाचा एक परिणाम म्हणजे मोठ्या शहरांची झालेली वाढ. महाराष्ट्रात गेल्या दशकात शहरांच्या वाढीचा वेग प्रचंड मोठा होता. आज महाराष्ट्रातील शे ४०% जनता शहरी भागात रहात आहे. मोठे उदयोग, शाळा महाविदयालये यांची स्थापना, व्यापारांची वाढ या सर्व कारणामुळे ग्रामीण भागातून लोकांचे शहरी भागात स्थलांतर होते आहे. या स्थलांतरामुळे अनेक शहरांच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

महाराष्ट्रामध्ये ही शहरीकरणाची प्रक्रीया काही भागात जास्त तीव्र व विकृत स्वरुपाची झालेली दिसते. कोल्हापूर इचलकरंजी हे गाव नव्या शहरीकरणाचे उत्तम उदाहरण आहे. शहराची यंत्रमागामुळे वाढ झाली. त्याच बरोबर शहराची लोकसंख्या खूप वाढल्यामुळे नगरपालिकेच्या कामामध्ये देखील वाढ झालेली आहे. परंतु नागरीकांना पुरवावयाच्या सेवा सुविधाबाबत नगरपालिकेची अकार्यक्षमता दिसून येते आहे. कदाचित सर्व लोकांना नागरी सुविधा पुरवण्याचे काम नगरपालिका प्रशासनाच्या आवाक्याबाहेरचे आहे, असे पालिकेचे मत असावे. पण समाजातील गरीब व शोषित लोकांच्या बाबतीत हा प्रश्न जास्तच गंभीर स्वरुपात प्रकट झालेला दिसतो. त्याचबरोबर शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या नागरी समस्यांना पालिका प्रशासनाला कशा प्रकारे तोंड दयावे लागते या बद्दल मनात

कुतूहल निर्माण होऊन अभ्यास करण्याबाबत गोडी निर्माण होऊ लागली. म्हणूनच शहरीकरणाच्या समस्या व नगरपालिकेचे राजकारण यांचा अभ्यास करणे हाच संशोधनाचा उद्देश आहे.

प्रस्तुत प्रबंधाची विभागणी पाच प्रकरणामध्ये केली असून संशोधनासाठी नगरपालिकेचे वार्षिक अहवाल पुस्तके, चरित्र विविध पक्षांचे जाहिरनामे, विविध पक्षातील राजकीय सामाजिक कार्यकर्त्यांचा मुलाखतींचा वापर अभ्यासासाठी करण्यात आला आहे. तसेच नगरपालिकेचे राजकारण जाणून घेण्यासाठी वृत्तपत्रातील बातम्या, लेख, यांचा उपयोग मोठ्या प्रमाणात झाला.

"महाराष्ट्रातील शहरीकरण व नगरपालिका" हे पहिले प्रकरण असून यात शहरीकरणाच्या समस्येबरोबरच शहरीकरण म्हणजे काय ? हे पाहता येईल. त्याचबरोबर इचलकरंजी शहराचे शहरीकरण कशा प्रकारे झालेले आहे. याचाही आढावा घेण्यात आला आहे. यंत्रमागावर काम करण्यासाठी त्याचबरोबर सूतगिरण्या, प्रोससर्स वगैरे उदयोग व्यवसायात कामानिमीत्त शहराच्या आसपासच्या गावातील लोकांचा ओघ इचलकरंजीकडे आहे. त्याशिवाय राजस्थान, गुजरात, कर्नाटक वगैरे प्रांतातून सुताचा व्यापार, दलाली करण्यसाठी व्यापरी वर्ग मोठ्या प्रमाणात एकवटलेला आहे. आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या शहराला शहरीकरणाच्या अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे.

प्रकरण दोन मध्ये इचलकरंजी शहराच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात आला आहे. सात छोटया छोटया गावांनी बनलेल्या इचलकरंजीला शहराचे स्वरुप प्राप्त होऊन आज तिची लोकसंख्या अंदाजे तीन लाखाच्या वर आहे. काळाच्या ओघात सामाजिक, आर्थिक परिस्थितीबरोबरच राजकीय परिस्थितीतही बदल झाला. आज शहरात पूर्वीप्रमाणे जात पात न मानता उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय व कनिष्ठ असे आर्थिक स्तर पाहिले जातात. राजकारणातही बदल घडून येताना आढळतो. पूर्वीइतके राजकारणाचे स्वरुप स्वच्छ न राहता अर्थकारणाचे राजकारण निर्माण झालेले दिसून येते.

प्रकरण तीनमध्ये इचलकरंजी नगरपालिकेची रचना, कार्ये व राजकारण यांचा आढावा घेतला आहे. १९९०-९१ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ११ नगरपालिका व २२८ नगरपालिका

कार्यरत आहेत त्यापैकी २२ 'अ' वर्ग, ४५ 'ब' वर्ग आणि १६१ 'क' वर्ग नगरपालिका आहेत. त्यापैकी इचलकरंजी नगरपालिकेचा 'अ' वर्गात समावेश होतो.

इ.न.पा. मध्ये

१) सार्वजनिक बांधकाम समिती.

२) शिक्षण समिती.

३) स्वच्छताविषयक वैदयाकिय आणि आरोग्य समिती.

४) पाणीपुरवठा समिती

५) नियोजन, विकास समिती.

याबरोबर इतर विषय समित्या कार्यरत आहेत. पालिकेला आवश्यक कार्याबरोबरच ऐच्छिक कार्ये ही पार पाडावी लागतात. याशिवाय वाढत्या शहरीकरणामुळे पालिकेची कर्तव्ये जबाबदा-या यात वाढ झालेली दिसून येते.

पालिकेतील राजकारणाच्या स्वरुपाबरोबरच १९९१ व १९९६ या नगरपालिका निवडणूकांचा आढावा घेतला आहे. १९९१ च्या निवडणूकीत नगरपालिकेत आवाडे गटाला सत्ता मिळाली होती. थोडक्यात कॉंग्रेसचे वर्चस्व होते. तर १९९६ मधील निवडणूकीत कोणत्याही गटाला बहुमत न मिळता त्रिशंकू अवस्था प्राप्त झाली. नागरीक आघाडी, शिवसेना-भा.ज.प. युती व अपक्ष यांच्यात समझौता होऊन नागरिक आघाडीचा नगराध्यक्ष झाला.

चौथ्या प्रकरणात शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणी-पुरवठा गलिच्छ वस्ती सुधारणा या चार महत्वाच्या क्षेत्रामध्ये नगरपालिकेने केलेल्या कामाची चिकीत्सा करण्यात आलेली आहे. गलिच्छ वस्ती सुधारणेबाबत १८०० घरकुलांपैकी ३०० घरांचा प्रकल्प पालिकेने पूर्ण केलेला आहे. आसरानगर येथे कुष्ठरोग्यांसाठी घरे बांधून त्यांचे पुनर्वसन केले आहे. महाराष्ट्रात प्रथमच इचलकरंजी नगरपालिकेने हे महत्वपूर्ण कार्य केले आहे. 'घर तेथे संडास' ही अभिनव योजना राबवण्यात येणार असून ६०% रक्कम नगरपालिका व ४०% रक्कम नागरीकांना खर्च करावी लागणार आहे. मुले शिक्षणाकडे आकर्षित व्हावीत, शाळेतील गळतीचे प्रमाण थांबावे यासाठी शिक्षण सहाय्य योजना काढली असून

त्याव्दारे १-४ थी पर्यंत मुलांना अनुदान देणेची योजना आहे. शहराला बारमाही पाणी-पुरवठा व्हावा यासाठी महत्वपूर्ण अशी कृष्णा योजना राबवण्यात येणार असून स्थानिक राजकारण व शासनाच्या निधीअभावी हे काम मंदगतीने सुरु आहे.

प्रकरण पाचमध्ये शहरीकरणाच्या नगरपालिकेच्या राजकारणावर झालेला परिणाम तपासून पहिला आहे. इचलकरंजी शहराच्या वाढत्या शहरीकरणामुळे पालिका राजकारणावर विकृत परिणाम झालेला दिसून येतो. नगरसेवकांची स्वार्थी प्रवृत्ती, नागरिकांचा निष्काळजीपणा, कर्मचा-यांचा बेजबाबदारपणा यामुळे राजकारणाबरोबरच पालिका प्रशासनावरही परिणाम झालेला जाणवतो. इ.न.पा.ला शासनाकडून मिळणारे अनुदान, विविध कर, निरनिराळ्या इमारतीपासून मिळणारे भाडे, जकातकर वगैरेतून उत्पन्न मिळते या उत्पन्नाचा विनीयोग पालिकेने भुयारी गटार योजना, रस्त्यांचे डांबरीकरण, झोपडपट्टी पुनर्वसन, पूरग्रस्तांचे पुनर्वसन कुष्ठरोग्यांचे निर्मूलन वगैरे निरनिराळ्या विकास कामांवर केला जातो. असे असले तरीही नगरपालिकेला पुरेशा निधीअभावी शासनाकडून होणारी दिरंगाई यामुळे शहरीकरणामुळे निर्माण होणा-या समस्यांना तोंड देताना पालिका प्रशासनाची दमछाक होत आहे.

इचलकरंजी नगरपालिका महाराष्ट्रातील एक श्रीमंत नगरपालिका म्हणून ओळखली जाते. वर्षाला ४५ कोट रु उत्पन्न असताना विकास प्रकल्प लवकर पूर्ण होऊन शहरीकरणाच्या समस्या सोडवण्यात पालिकेला यश यायला हवे. पण वास्तविक परिस्थिती तशी नाही.

शहराचे विविध प्रश्न निधीच्या अभावी पूर्ण करण्यास नगरपालिकेला दिवसे न् दिवस अवघड व त्रासाचे होवू लागले आहे. मूळ गावठाणाच्या आजूबाजूस विविध वसाहती वाढत आहेत. राहण्याच्या जागांचा प्रश्न दिवसे न् दिवस जटील होवू लागला आहे. वाढीव भागात रस्ते/सार्वजनिक संडास/गटारी यांची व्यवस्था करण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनावर येवून पडते. महाराष्ट्र नगरपरिषद/नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ४९ मध्ये नगरपरिषदांची ऐच्छिक व आवश्यक कर्तव्ये नमूद केली आहेत. पण आवश्यक कर्तव्ये पुरी करणे ही ब-याच नगरपरिषदांना शक्य होत नाही. कलम १०५ मध्ये जे सक्तीचे कर आहेत त्यातून मिळणारे

उत्पन्न व शासनाकडून मिळणारे अनुदान यावर अवलंबूनच सर्व व्यवस्था करणेशिवाय पर्याय रहात नाही. नित्यनैमित्तिक कामाशिवाय महाराष्ट्र, प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार विकास आराखडयाची अंमलबजावणी करावी लागते. पण या सर्व कर्तव्यांसाठी पूरेसा निधी नगरपरिषदांच्या हाती असत नाही.

नगरपालिकेला आपली बरीच लोकोपयोगी कामे वर्गणीव्दारे/लोकवर्गणीव्दारे पूर्ण करता येतील. पण अशी लोक वर्गणी वसूल करण्यासाठी नगरपरिषद कायदयात सुस्पष्ट तरतूद नाही. त्यामुळे अशी वर्गणी जमा करुन कामे पूर्ण करणे शक्य होत नाही. सार्वजनिक संडास/गटारी यांचेसाठी लोकवर्गणी घेण्यास परवानगी घेण्याची नितांत गरज आहे. मात्र अशी लोकवर्गणी वसूल करण्याची पध्दत, त्याच्या विनीयोगाची कार्यपध्दती कायदयात समाविष्ट केली पाहिजे. त्याचप्रमाणे विविध विकास कामांसाठी नागरिकांकडून देणगी घेण्यास नगरपालिकेस परवानगी दिल्यास ती सुध्दा एक चांगली बाब ठरेल त्याचा शासनाने जरुर विचार करावा. मात्र बळाचा वापर करु शकत नाही. ती योजना अन्य एजन्सीकडे सोपविण्याचे अधिकार महराष्ट्र नगरपरिषद/ नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियमातील कलम ४९ 'ए' मध्ये समाविष्ट केले आहेत. त्यासंदर्भात शासनाकडून योग्य त्या अटी ठरवून घेऊन शहरात एक उत्तम सुविधा देण्याची तत्परता स्थानिक प्रशासनाने दाखवली पाहिजे.

नगरपालिकेचा आणि नागरीकांच्या व्यक्तीगत आणि प्रापंचिक जीवनातील अनेक बाबींचा किंबहुना अत्यंत महत्वाच्या बाबींचा फार जवळचा संबंध असतो. दिवसे न् दिवस तो वाढतो आहे. अशावेळी नगरपालिकेचा कारभार लोकाभिमुख असायला हवा, तसेच भ्रष्टाचार विरहीत स्वच्छ असायला हवा. याकरिता कारभारी यंत्रणेची व कार्यपध्दतीची सर्वकंष फेररचना करणे जरुरीचे आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेचे शक्य तेवढे विकेंद्रीकरण करुन केंद्रीय कार्यालय व विकेंद्रीत कार्यालय यामध्ये सुसूत्रता असावी याचबरोबर सध्याची वॉर्डवर मतदार संघ पध्दती रद्द करुन सध्याच्या तीन चार वॉर्डाच्या एका मतदार संघातून तीन वा चार उमेदवार निवडून येतील. तसे करायचे नसेल तर मग नगराध्यक्षाची निवड ही थेट संपूर्ण नगराच्या मतदाराकडून थेट मतदानाने करण्याची पध्दती स्वीकारली

पाहिजे. कारण मग असा नगराध्यक्ष ख-या अर्थाने सर्व नगरवासियांचा प्रतिनिधी ठरुन प्रशासनाचा प्रमुख होण्यास पात्र ठरेल.

सध्याच्या परिस्थितीत, नगरपालिका या गुंड व असामाजिक तत्वाकडून काबीज केला जाण्याचा धोका वाढल्याशिवाय राहणार नाही. तसे व्हायचे नसेल तर नगरसेवक निवडणूकीच्या सध्याच्या पध्दतीत वर सुचवल्याप्रमाणे बदल करायला हवेत. अन्यथा, स्थानिक स्वराज्य संस्था ह्या असामाजिक तत्वांचे अड्डे बनल्याशिवाय राहणार नाहीत.

वरील सर्व विवेचनावरुन असा निष्कर्ष दिसून येतो की, इचलकरंजी शहराचे वाढते शहरीकरण व सतत वाढत जाणारी लोकसंख्या याचा विचार करता नगरपालिका प्रशासनावर कामाचा ताण पडलेला दिसून येतो जरी ही श्रीमंत नगरपालिका असली तरी शासनाकडून अनुदान कपातीचे धोरण, कामातील दिरंगाई, वेळ काढू धोरण नगरसेवकांची स्वार्थी प्रवृत्ती यामुळे इचलकरंजी नगरपालिकेला (काही चांगल्या विकास योजना राबवल्या असल्या तरी नागरी जीवनासाठी आवश्यक असणा-या सत्तवा सुविधा पुरवण्यात ८०%असामाधान मानावे लागले आहे. शहराच्या शहरीकरणाचे विकृतीकरण होऊ लागल्याचे दिसून येते विशेषत: शहराचा उत्तरेकडील भागात सातत्याने अशांतता जाणवते. हे विकृतीकरण आहण्यासाठी नागरिकांनी विशेषत: तरुण वर्गाने सामाजिक मुल्ये, परंपरा यात बदल घडवून आणला पाहिजे व स्थानिक राजकारणात अधिक लक्ष देवून शहराचा विकास उत्तम रितीने होण्याकडे लक्ष दिले पाहिजे. मात्र अर्थकारणाचे राजकारण होऊ नये.